# नगरपरिषदेचा भांडारपाल स्वच्छतासह अनेक कोट्यावधी रुपयांच्या कामाची जिम्मेदारी भागवत जाधवांच्या खांद्यावर वाचा पुढील अंकात..!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564






■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १८९ ■ शुक्रवार दि.२८ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 189 ■ Friday Dt. 28 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# बीड नगरपरिषदेचा स्वच्छता विभागाचा कोट्यावधी रुपयांचा घोटाळा भागवत जाधवच्या माथी!

## बीड नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागात पडद्यामागून भागवत जाधवची गुत्तेदारी?

## भागवत जाधव नेमका अंधारे, पगारेंच्या इशाऱ्यावर का चालतो? सहभाग नोंदवणारा एसआय म्हणून जाधवची ओळख!

## बीड नगरपरिषद स्वच्छता विभाग एसआय भागवत जाधव नीता अंधारे गणेश पगारे यांच्या कारनाम्यात सक्रिय?

## भागवत जाधव स्वच्छता विभागातील अनेक कर्मचाऱ्यांच्या बोगस हजऱ्या घेण्यामध्ये माहीर वाचा पुढील अंकात..!

बीड । प्रतिनिधी

बीड नगर पालिकेवर गेल्या चार वर्षापासून प्रशासक असल्याने येथील कर्मचारी व अधिकाऱ्यांना लाखोंचा भ्रष्टाचार करायला रान मोकळे झाले आहे. याचा उत्तम उदाहरण म्हणजे नगर पालिकेकडून एलईडी लाईट खरेदीत लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. एलईडी खरेदी ही विद्युत विभागामार्फत करणे आवश्यक असताना त्याची खरेदी ही भंडार विभागामार्फत करण्यात आली आहे. अत्यंत बोगस कंपनीच्या एलईडी खरेदी अव्वाच्या सव्वा किंमत लावून न.प.च्या भंडारपाल असणार्या भागवत जाधव यांनी शासनाच्या पैसाचा चुराडा केला असून या प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषींविरुध्द कडक कारवाई करण्याची मागणी शिवराजे जनकल्याण ग्रुपचे संस्थापक मुकुंद भोसले यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे.

जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात मुकुंद भोसले यांनी म्हटले आहे की, बीड नगरपरिषद मध्ये बसविण्यात आलेल्या एलईडी लाईट मध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार सुरू आहे. अधिकाऱ्याच्या संगनमताने भ्रष्टाचार भंडार विभागामार्फत सुरू आहे. बीड अंतर्गत सध्या शहरांमध्ये मोठ्या प्रमाणावर विद्युत पोलवरती एलईडी लाईट ३५/७० वेट च्या लाईट खरेदी करण्यात आलेल्या आहेत विद्युत विभागामार्फत खरेदी करणे गरजेचे असताना देखील नगरपालिकेने सिओ अंधारे मॅडम यांनी जाणीवपूर्वक भंडार विभागामार्फत एलईडी लाईट ही यश कंपनीची खरेदी केलेले आहेत तरी त्यापीडब्ल्यूडी अप्रोड मटेरियल त्याप्रमाणे लाईट लावलेली नाही व तसेच बीड नगरपालिकेमध्ये दोन अभियंता असताना देखील सिओ अंधारे मॅडम यांनी जाणीवपूर्वक भंडार विभागामार्फत एलईडी लाईट खरेदी केलेल्या आहेत. युवा ही कंपनी पीडब्ल्यूडी याची ऑपौरेड नसून त्या कंपनीची लाईट खरेदी कोणत्या आधारे केलेली आहे तरी ही एक एलईडी लाईट जवळपास ५००० रुपये किमतीची आहे हा भंडार इन्चार्ज जाधव नावाच्या व्यक्तीकडे नवीन नवीन फंडे आणून नगरपालिकेचा पैसा स्वतःच्या खिशामध्ये घालत आहे तरीही त्याच्याकडे कोणत्याही अधिकाऱ्याचे लक्ष नाही. संबंधित एलईडी खरेदी प्रकरणाची सखोल चौकशी करुन दोषी असणार्या भागवत जाधववर कडक कारवाई करण्याची मागणी युवा नेते मुकुंद भोसले यांनी केली आहे.



# संतोष देशमुख हत्याप्रकरणात सुग्रीव कराडची एंट्री

### आरोपी जयराम चाटे अन् महेश केदारने मांडली नवीनच थेअरी

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणाची न्यायालयीन सुनावणी सुरू झाली असून विशेष सरकारी वकील उज्ज्वल निकम यांच्या उपस्थितीत बीड न्यायालयात दोन दिवसांपूर्वीच पहिली सुनावणी झाली. यावेळी, उज्ज्वल निकम यांनी आपली बाजू मांडताना आरोपींच्या कृष्णकृत्याचा कित्ताच गिरवला. तसेच, सीआयडी पोलिसांच्या तपासात हा खून खंडणीसाठी करण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून आरोपींनी याची कबुली दिल्याचेही त्यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. सध्या या गुन्ह्यातील ८ वा आरोपी कृष्णा आंधळे हा फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. आता, याप्रकरणी आणखी नवी माहिती समोर आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात आता सुग्रीव कराडची एंट्री झाली असून सुग्रीव कराडच्या सांगण्यावरुन संतोष देशमुख आणि मस्साजोगच्या ग्रामस्थांनी सुदर्शन घुलेला मारहाण केली होती. त्याच, पूर्ववैमनस्यातून हे हत्याकांड घडल्याचे जयराम चाटे आणि महेश केदार यांनी दिलेल्या कुबली जबाबात म्हटले आहे. या दोन्ही आरोपींच्या कबुली जबाबात खंडणीचा उल्लेख नाही, तर सुदर्शन घुलेच्या अपमानाचा बदला घ्यायचाय म्हणून आपण संतोष देशमुखांना मारहाण केल्याचा उल्लेख आहे. विशेष म्हणजे जयराम चाटे आणि महेश केदारच्या कबुली जबाबात सुग्रीव कराडच्या नावाचा उल्लेख करण्यात आला आहे. फरार कृष्णा आंधळेने या दोघांना असे सांगितले होते की, सुग्रीव कराडच्या सांगण्यावरुनच सरपंच संतोष देशमुख आणि मस्साजोगच्या ग्रामस्थानी सुदर्शन घुलेला मारहाण मारहाण केली. त्यामुळे, सुदर्शन घुले आणि वाल्मिक अण्णाची बदनामी झालीय, त्याचा आपल्याला बदला घ्यायचाय, असे सांगत चाटे आणि केदारला कृष्णा आंधळेने सोबत घेतले होते.

**कोण आहे सुग्रीव कराड**

सुग्रीव कराड हा बीड जिल्ह्याच्या केजमधील रहिवाशी असून तोही स्थानिक गुंड असल्याची माहिती आहे. आमदार धनंजय मुंडे आणि वाल्मिक कराडसोबत त्याने काम केलं आहे. केज नगरपंयायत निडणुकीवेळी सुग्रीव कराडने खासदार बजरंग सोनवणेंच्या मुलाचा पराभव केला होता. लोकसभा निवडणुकीपर्यंत तो खासदार सोनवणेंचा विरोधक होता. मात्र, सध्या तो खासदार बजरंग सोनवणेंसोबत आहे. तर, तो राजकीय व्यक्ती असून पंयायत समितीच्या निवडणुकीत त्याने आपल्या आईला निवडून आणले आहे.

# भगवंताच्या स्मरणात सुख शांती व आनंदाचा मार्ग मोकळा होतो : श्रीहरी महाराज

## श्री.सिद्धेश्वराच्या पावन भूमीत शिव कथेत शंभु –पार्वती यांचा विवाह सोहळ्यात प्रतिपादन

गेवराई । प्रतिनिधी

शिव आणि शक्ती अनादी कालापासून ह्या ब्रम्हांडाच्या उत्पत्ती स्थिती आणि लय या तिघांचे साक्षीदार आहेत. कथेमध्ये शिव पार्वती विवाह समारंभ प्रसंगी सज रहे भोले बाबा निराले दूल्हे थे या भजनांवरती सर्वांनी नृत्य करून आनंद घेतला. शंभु –पार्वती विवाह समारंभात हिमालय पर्वत मेणा राणी, लक्ष्मीनारायण, ब्रह्मदेव, नारद महामुनी, तसेच भूतांची आणि नंदी व शंभू महादेव –पार्वती यांची सजीव आरस करण्यात आली. मंत्रघोषात मंगलाष्टका सादर करण्यात आले. सावता नगर येथे सुरू असणाऱ्या श्री शिव महापुराण कथेत चौथ्या दिवशी भव्य श्री शंभू महादेव –पार्वती विवाह सोहळा संपन्न झाला.

भव्य संगीतमय श्री शिव महापुराण कथा चालू असून यामध्ये चौथ्या दिवसाच्या कथेमध्ये शंभु महादेव–पार्वती यांचा विवाह सोहळा थाटात झाला. यावेळी शंभू महादेवाचा – पार्वतीचा पोशाख केलेल्या पात्रांनी उपस्थितांची मने वेधून घेतली. या कथेतील विवाह सोहळयासाठी पुरुषांसह महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होती. शहरातील सावता नगर येथे भव्य संगीतमय श्री शिव महापुराण कथेची सुरुवात सिद्धेश्वर मंदिराजवळ सोमवार दि. २४ रोजी झाली असून कथा प्रवक्ते ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांच्या मधुर वाणीतून शिवपुराण कथेतील भगवान शंभु महादेवाच्या अनेक आध्यात्मिक लिलाचे वर्णन केलें. या जीवनाचेच दुसरे नाव संघर्ष आहे. जीवनात संकटे येणं स्वाभाविक आहे. दु:खाचा अंध:कार दूर झाल्यानंतर सुख प्राप्ती होते. जीवनात सुख–दु:ख येतच असतात. यासाठीकोणताही परिस्थिती उद्भवल्यास घाबरण्याचे कारण नाही. कधी–कधी मनुष्य जेव्हा संकटांच्या कचाट्यात सापडतो तेव्हा तो परमेश्वराला विसरल्यानेच त्याच्यावर ही परिस्थिती ओढवलेली असते. तेव्हा तो दु:खी होतो आणि आपल्या नशीबालाच दोष देत राहतो. परमेश्वरालाच वाईट म्हणतो. माणसाच्या जीवनात जे सुख दु:खाचे प्रसंग येतात हा भाग्याचा दोष नसून त्याने केलेल्या कर्माचे फळ आहे त्यामुळे भगवंताच्या स्मरणात सुख शांती समाधान नांदत असते. शंभू महादेवांच्या कृपेने अनेकांच्या अडचणीचा सामना सहज सोपा झाला शिवपुराण या कथा श्रावणात सर्वात मोठी शक्ती आहे. भगवान शंभू महादेवाच्या भक्तीतून अनेक महिला मंडळ जिवापाड श्रद्धा ठेवतात असे प्रतिपादन ह भ प कथा प्रवक्ते श्री. हरी महाराज रसाळ यांनी व्यक्त केले.यावेळी परिसरातील महीला पुरुष लहान थोर मंडळींनीही अतिशय उत्साहाच्या वातावरणामध्ये हा विवाह सोहळयामध्ये महिला व पुरुष बांधवांनी सहभाग घेतला. सकाळच्या सत्रातील ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणास ही मोठ्या प्रमाणात प्रतिसाद असून ज्ञानेश्वरी पारायण व कथेची सांगता सोमवार दि. ३१ मार्च रोजी होणार आहे. ह.भ.प. श्रीहरी महाराज रसाळ यांचे काल्याचे किर्तन होणार असून महाप्रसादने कथेची सांगता होणार आहे. या श्री शिव महापुराण कथेचा पंचक्रोशीतील नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन सर्व आयोजन कमिटीच्या वतीने वतीने करण्यात आले आहे.



# पाच लाखापर्यंतच्या कर्ज धारकांसाठी गजानन बँकेचा केशर ऋणरक्षा निधी

## मयत कर्ज धारकांच्या वारसांना मोठा दिलासा देणारा निर्णय

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात नावाजल्या जाणार्या बँकेपैकी एक बँक असणारी श्री गजानन नागरी सहकारी बँकेने कर्ज धारकांसाठी नाविन्यपूर्ण योजना आखली असून बँकेच्या कर्ज धारकांसाठी केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत वारसांना मोठा दिलासा मिळणार असून पाच लाखापर्यंतच्या कर्ज धारकाच्या निधनानंतर त्यांचे कर्ज ऋणरक्षा निधीच्या माध्यमातून परतफेड करून घेत कर्जदारांच्या वारसांना तसेच जामीनदारांना यातून ऋणमुक्त करण्यात येणार असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी दिली.

श्री गजानन नागरी सहकारी बँकेने सभासद नाममात्र सभासद व कर्मचारी यांना कर्ज वाटप केलेले आहे.मयत झालेल्या कर्ज धारकांना केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत कर्ज परतफेडची चिंता राहू नये यासाठी पाच लाखापर्यंतच्या कर्ज घेतलेल्या सभासदांचे अचानक निधन झाल्यास सदरील कर्ज परतफेडीबाबत अडचणी येत असतात. घेतलेले कर्ज आणि त्यावरील व्याजाच्या रकमेचा विचार करता बँकेच्या संचालक मंडळाने नावीन्यपूर्ण योजना आखली असून केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत सभासदाला कर्ज देतानाच एक टक्का व पुढील प्रत्येक वर्षी प्रती लाखाला पाचशे रुपये ऋणनिधी आकारला जाणार असून कर्ज परतफेडीच्या कालावधीत सभासदाचे अचानक निधन झाल्यास या योजनेतून घेतलेले कर्ज बेबाक करून कर्जदारकाचे वारस आणि जामीनदार यांना मुक्त केले जाणार आहे. केशर ऋणरक्षा निधी जानेवारी २०२५ पासून लागू करण्यात आला असून दरम्यानच्या काळात मैदा येथील कृष्णा कारभारी राऊत यांनी या योजनेत सहभाग घेतला होता.

१ मार्च २०२५ रोजी कृष्णा राऊत यांचे अल्पशा आजाराने निधन झाले घरातील एकमेव कमावता व्यक्ती गेल्याने कर्जाची चिंता होती. मात्र केशर ऋणरक्षा अंतर्गत राऊत कुटुंबीयांना व जामीनदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निधी अंतर्गत राऊत यांना एक लाख रूपये व अन्य निधी मिळून बँकेने सवलत देत त्यांचे संपूर्ण कर्ज बेबाक केले. कृष्णा राऊत यांच्या कुटुंबीयांना बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर आणि संचालक मंडळाने केशर ऋणरक्षा निधी अंतर्गत बेबाक प्रमाणपत्र देऊन कर्ज मुक्त केले आहे. गजानन बँकेत पाच लाखापर्यंत कर्ज घेणार्या सभासदांची संख्या १२०७ असून या निधी अंतर्गत या सभासदांना मोठा दिलासा मिळणार आहे.

ऋणरक्षा निधीची सवलत मिळवण्यासाठी मयत कर्जधारकांच्या वारसांनी कर्जधारकांचे मृत्यू प्रमाणपत्र व अर्ज बँकेत दाखल करावा कर्ज घेतलेल्या कर्ज धारकाचा मृत्यू एक वर्षाच्या आत झाल्यास ५० टक्के,एक वर्षानंतर ७५ टक्के,आणि दोन वर्षानंतर शंभर टक्के कर्ज ऋणरक्षा निधी अंतर्गत सवलत देऊन माफ करण्यात येणार आहे, सभासदांनी अधिक माहितीसाठी बँकेचे संचालक तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी, शाखाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन बँकेचे अध्यक्ष माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, उपाध्यक्ष जगदीश काळे यांनी केले आहे.




# वार्ड क्रमांक १८ मधील नागरिक भोगताहेत नरक यातना

## रमजानसाठी निघालेले ढीग भर पत्रक ठरले वांझोटे

बीड । प्रतिनिधी

शहरातील वार्ड क्रमांक १८ मधील नागरिकांना जीवन जगताना अक्षरश: नरक यातना भोगाव्या लागत आहेत. येथील मोठा नाला तुडुंब भरल्याने त्याचे गलिच्छ पाणी रस्त्यांवरून वाहत असून नाल्याच्या गलिच्छ पाण्यापासून वाचण्यासाठी लोकांना रस्त्यांवर विटा ठेवून मार्गक्रमण करावे लागत आहे. विशेष म्हणजे रमजान महिन्यात मुस्लिम बांधवांनी विविध समस्यांबाबत काढलेल्या पत्रकांचा काही एक उपयोग झाला नसल्याचेही यावरून दिसले. रमजानसाठी काढलेली पत्रके दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वांझोटीच ठरल्याचे दिसून आले, असे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

बीड शहरातील सुप्रसिद्ध सुफी संत हज़रत शहिंशहावली दर्गा शेजारी असलेल्या उमर मस्जिद आणि मुहम्मदीया मस्जिद या दोन्ही मस्जिद मध्ये जाऊन नमाज पठण करणाऱ्या नमाजींना नाल्याच्या पाण्यामुळे मोठ्या प्रमाणात असुविधा व त्रास होत आहे. रस्त्यावरून वाहणाऱ्या गलिच्छ पाण्यात पाय जाऊ नये, गलिच्छ पाण्याचे शिंतोडे



कपड्यांवर उडू नये याची दक्षता घेत मुस्लीम बांधवांना ये–जा करावी लागत आहे. सध्या इस्लाम धर्माचा पवित्र रमज़ान महिना सुरू आहे. ईद अवघ्या तीन दिवसांवर आली आहे परंतु याचे कुठलेही सोयरसुतक बीड नगरपरिषद, मुख्याधिकारी किंवा प्रशासनाला असल्याचे दिसत नसल्याने येथील नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे. याकडे बीड नगरपरिषद प्रशासन आणि मुख्याधिकारी लक्ष देतील का? असा प्रश्न या अनुषंगाने उपस्थित होऊ लागला असल्याचे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.



जय सिंह भाऊ पंडित यांचा उपस्थित सेलू तालुका गेवराई इफ्तार पार्टी चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सरपंच अमर सोलंकी, भास्कर यादव, चांद भाई शेख, रसूल शेख, यूनुस शेख, नजीर शेख, सलीम शेख, इसाक शेख, चंद्रकांत जगताप, प्रल्हाद शिंदे, प्रल्हाद यादव, बंडू दादा भुईटी यांच्यासह अनेक हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते.

# रोप–वे मुळे बीड–नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला

बीड । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथगड (मायंबा) ते पाथर्डी तालुक्यातील श्री क्षेत्र कानिफनाथगड (मढी) या दरम्यान ३.६ कि.मीच्या रोप–वे प्रकल्पाला राज्य सरकारने मान्यता देवून नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल राज्याच्या पर्यावरण, वातावरणीय बदल व पशूसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी राज्य व केंद्र सरकारचे आभार मानले आहेत.

या दोन्ही गडा दरम्यान रोप–वे सुरू करावा यासाठी पाथर्डीचे आमदार मोनिका राजळे यांनी वेळोवेळी पाठपुरावा व प्रयत्न केला होता, त्यांच्या पाठपुराव्या नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या सहकार्याने शासनाच्या राष्ट्रीय रोप–वे कार्यक्रम पर्वतमाला या अंतर्गत मायंबा ते मढी या ३.६ किमीच्या हवाई अंतरामध्ये सदर रोप–वे सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

या प्रकल्पामुळे बीड–नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळणार असुन ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या यामुळे वाढणार आहे. ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी देखील यामुळे उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे दोन्ही जिल्ह्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्राला चांगला फायदा होणार आहे. दरम्यान, हा रोप–वे सुरू करुन नाथ भक्तांना सुविधा उपलब्ध करुन दिल्याबद्दल ना. पंकजाताई मुंडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार मानले आहेत.

# कार्यतत्पर, कर्तव्यनिष्ठ, सर्वमान्य नेतृत्व : मा.श्री.संजयशेठ नवले पाटील

काही व्यक्तिमत्त्व ज्या समाजात आपण राहतो, त्या समाजाचे आपण काही देणं लागतो, याचा ते कधीही विसर पडू देत नाहीत, त्या देण्यातून उतराई होण्यासाठी सतत प्रयत्न आपल्या समाज हित कार्यातून करत इतराना प्रेरणा देत असतात, प्रत्येक चांगल्या–वाईट प्रसंगाला सामोरे जात, सर्वसामान्यांचा आधार बनत असतात. आव्हानात्मक परिस्थिती आलीच तर सर्वसामान्यांच्या पाठीशी खंबीर उभे राहून अन्यायाविरुद्ध उभे राहत असतात, योग्य वेळी योग्य निर्णय घेणारे, प्रत्येकाच्या मनामनात आपल्या कार्यातून विराजमान झालेले नेतृत्व म्हणजे विद्यमान जिल्हा परिषद जेष्ठ नेते मा.श्री.संजयशेठ नवले पाटील यांचे आज अभिष्टचिंतन... त्यानिमित्ताने मी राहुल मोरे व मित्रपरिवार च्या वतीने शुभेच्छा देतो, त्यांच्या कार्याविषयी काही अंशी प्रकाश टाकणारा हा लेख.



वहाँ तुफान भी हार जाते है,जहाँ कश्तिया जीद्द पर होती है हे तंतोतंत वाक्य लागू होते ते म्हणजे मा.श्री. संजय नवले पाटलांना कारणही तसंच काहीसं वेगळं आहे ते म्हणजे काही दिवसापूर्वी आजारावर मात करून आज सर्वसामान्यांच्या आशीर्वादाने पुन्हा मोठ्या जोमानी कार्य ते करत आहे. राजकारणापेक्षा समाजकार्यांना महत्त्व देऊन माणसाच्या कामी येणे हा त्यांचा गुण अफचूकच सर्वांना भावतो हे नक्की.

वडिलांकडून राजकारणाचे धडे गिरवत मा.राज्यमंत्री तथा आष्टी पाटोदा शिरूर मतदारसंघाचे विद्यमान आमदार तथा बीड जिल्ह्याचे भाग्यविधाते मा.श्री. सुरेश आण्णा धस यांच्या सोबत राजकारणात येऊन त्यांच्या सोबत कार्य करत सर्वसामान्यांचे प्रश्न मार्गी लावण्याचे काम करत आहेत.

आजकाल ईतभर केलेले काम हातभर दाखवण्यात व प्रसिद्धीच्या झोतात येण्यात काही लोक धडपडताना दिसतात, परंतु या उलट प्रसिद्धीपासून कोसो दूर असलेले व आपल्या कार्यातून समाज आधार बनलेले संजय नवले पाटील हे जनसामान्याच्या कार्यात व्यस्त दिसतात व ते कधीही मोठेपणा मिरवताना दिसत नाहीत. आलेला प्रत्येक व्यक्ती आपला, आणि त्याची अडचण हि आपली अडचण समजून सोडण्याचे कार्य त्यांनी निस्वार्थ भावनेतून करत असतात त्याचा वेगळा नेतृत्वगुण सर्वांना त्यांच्याकडे आकर्षित करतो तो म्हणजे प्रत्येक कामात पारदर्शकता, प्रत्येक क्षणी मदत, शब्द पाण्यात सक्रिय, नेहमी कष्ट करण्याची ते काम यशस्वी करण्याची जिद्द, आशावादी दृष्टिकोन, स्वतंत्र विचारसरणी, सकारात्मक वृत्ती,प्रामाणिकपणा, प्रबळ आत्मविश्वास, निर्णयक्षम नेतृत्व, विचारांची बांधिलकी, संघटन कौशल्य अशा एक ना अनेक गुणांचा महासागराचे संजय नवले पाटील आहेत.

ते विविध योजना आपल्या परिसरात प्रभावीलेल्या आहेत.रस्ते विकास, कौशल्य विकास, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत मिशन, जलमिशन, विविध शैक्षणिक योजना आरोग्य योजना, कृषी योजना, जलसंधारण योजना, आदीसह विविध शासकीय योजना जनसामान्य पर्यंत प्रभावी राबवून जनसामान्यांच्या जीवनात आधार देण्याचे कार्य त्यांनी केले आहे, करत आहेत.कौशल्य– रोजगार– उद्योजकता युवा वर्गाला मार्गदर्शक आहेत. आजच्या नवनवीन तंत्रज्ञान उपयोगात आणून सामाजिक बांधिलकी जोपासत, आपले कार्य करत आहेत, त्यांचे नेतृत्व स्वयंपूर्ण आणि स्वकर्तृत्वाने झालेले असून त्या मार्गाने ते स्वसामर्थ्याने चालत आहेत. धाडसी निर्णय घेणे त्यांच्या राजकीय प्रवासातील महत्त्वाचे वैशिष्ट्य असून 'धाडस तोच करतो, ज्याच्या मनात आणि मनगटात ताकद असते .अशा या धाडसी नेत्याच्या पाठीमागे सदैव मायबाप जनता पाठीशी आहे. आजपर्यंतच्या राजकीय प्रवासात ते अपार कष्ट आणि जनसामान्याची मिळवलेला आशीर्वादाने च हे राजकीय नेतृत्वाने मोठे आहे.




आत्तापर्यंत किती काम केले याचं मोजमाप मायबाप जनतेने करावा, परंतु हाडाची काड करून परिस्थिती कुठलीही असो आयुष्यभर तुमच्यासाठी असंच झटत राहील,असा शब्द त्यांच्या ओठावर नेहमी असतो. त्यामुळे निश्चितच हा नेता आज सर्वसामान्यांच्या मनात घर करून आहे.उतणार नाही,मातणार नाही, घेतला वसा टाकणार नाही, या प्रमाणे जे आश्वासन देणार तेच करणार हे तत्त्व स्वतःच्या जीवनात अंगीकारून सर्वसामान्य आणि गावच्या विकासासाठी झटणाऱ्या नेतृत्वाला जनता आता मोठ्या पदावर घेवुन जाणार हे स्पष्ट दिसत असून आता जनताच त्याची भावना सर्वांसमोर व्यक्त करताना दिसत आहे.अशा या सर्वसामान्यांचा आधार असलेल्या नेत्यास राजकीय पटलावर, सामाजिक पटलावर त्यांची उत्तरोत्तर प्रगती व्हावी, लोकांचे प्रश्न दूर करण्याची तळमळ असणारे मा.श्री. संजय नवले पाटील हे अनेक यशाचे शिखरे यशस्वीपणे चढुन राजकारणात अढळ स्थानावर पोहचवावी हीच वाढदिवसानिमित्त आई जगदंबे चरणी प्रार्थना करतो व पुन्हा एकदा त्यांना वाढदिवसाच्या मनस्वी शुभेच्छा देतो.

**लेखन**
**राहुल मोरे, बीड.**

# तालुक्यातील मच्छिंद्रनाथ गड ते कानिफनाथ गड होणार रोपवे, कॅबिनेटमध्ये मंजुरी

आष्टी । प्रतिनिधी

भारतातील मच्छिंद्रनाथनाथाची एकमेव संजीवनी समाधी असलेल्या देवस्थानावर दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत असताना येथील नाथ भक्तांना अधिकाधिक सेवा देण्यासाठी मच्छिंद्रनाथ देवस्थानचे विश्वस्त तथा आमदार सुरेश धस यांनी शासन दरबारी पाठपुरावठा करत कॅबिनेट मध्ये स्वतः राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आष्टी तालुक्यातील सावरगांव मायंबा ते पाथर्डी तालुक्यातील असलेल्या कानिफनाथ देवस्थान या ३.६ कि.मी.अंतरावर रोपवे ची मान्यता दिली असून,या सुविधेमुळे नाथभक्तांच्या वतीने आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री व राज्यशासनाचे आभार मानले आहेत.

राज्याच्या शासनाच्या पर्यटक विभागाने राज्यात छक्ळ्चङ कंपनी मार्फत नविन २९ पर्यटनठिकाणी रोपवे सुरु करण्याचा करार केला असून, यामध्ये ३.६ कि.मी.साठी आष्टी तालुक्यातील मायंबा मच्छिंद्रनाथ गड ते पाथर्डी तालुक्यातील मढी येथील कानिफनाथ देवस्थानचा समावेश करण्यात आला असल्याने नाथभक्तांची सोय होणार आहे.यामुळे रोपवे मुळे नाथभक्तांना या स्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सुलभ होणार असून, स्थानिक अर्थव्यवस्थेलाही चालना मिळणार आहे.

**शब्दांचे पक्के...देवेंद्र बाहुबली..!**

दि. ५ फेब्रुवारी रोजी राज्याचे कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब हे श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गड येथे संजीवन समाधी मंदिर भूमीपर्यंत सोहळ्यास उपस्थित होते त्यावेळी श्री क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड देवस्थान ट्रस्ट व श्री क्षेत्र कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढी यांनी श्री. क्षेत्र मढी ते श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गड (मायंबा) ते क्षेत्र कानिफनाथ गड मढी (मायंबा) रोप-वे यास मा.मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब व केंद्रीय मंत्री श्री.नितीनजी



गडकरी साहेब यांच्या सहकार्याने त्या कामास शासनाची मान्यता मिळाली असल्याने आष्टी तालुक्यातील क्षेत्र मच्छिंद्रनाथ संजीवन समाधी व लगतच पाथर्डी तालुक्यात असणारे श्रीक्षेत्र कानिफनाथ संजीवन समाधी हे पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र हे हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून या ठिकाणी श्री मच्छिंद्रनाथ व कानिफनाथ यांच्या दर्शनासाठी लाखो भाविक राज्याच्या कानाकोपऱ्यातून येतात.सदरील रोप-वे मुळे येथील स्थानिक पर्यटनास चालना मिळणार असून त्या माध्यमातून रोजगार निर्मिती होईल.भाजपा महायुती सरकारच्या माध्यमातून मतदारसंघात विकासाची गंगा आणण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.शासनाच्या राष्ट्रीय रोप-वे कार्यक्रम-पर्वतमाला अंतर्गत श्री क्षेत्र सावरगांव (श्री मच्छिंद्रनाथ गड) ते श्री क्षेत्र मढी (चैतन्य कानिफनाथ गड) ते या ३.६ कि.मी. हवाई अंतरामध्ये रोप-वे बसविन्यास मान्यता दिल्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब तसेच केंद्रीय मंत्री, श्री.नितीनजी गडकरी साहेब तसेच उपमुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री श्री.अजितजी पवार साहेब यांचे खुप खुप धन्यवाद...!

**-सुरेश धस, आमदार**

या प्रकल्पांमुळे बीड-नगर जिल्ह्याच्या पर्यटन विकासाला नवी दिशा मिळेल.ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांना भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढेल.स्थानिक कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन मिळेल.ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. राज्य सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील पर्यटन आणि दळणवळण क्षेत्रात मोठी सुधारणा होईल.

**-सुरेश धस मच्छिंद्रनाथ देवस्थान विश्वस्त तथा आमदार**

या प्रकल्पांची अंमलबजावणी राष्ट्रीय महामार्ग लॉजिस्टिक व्यवस्थापन लिमिटेड (छक्ळ्चङ) मार्फत होणार आहे. यासाठी राज्य सरकार आवश्यक ती मदत करणार आहे. 'पर्वतमाला' योजनेअंतर्गत रोपवे प्रकल्प दोन पर्यायांद्वारे राबवले जाणार आहेत. पहिला पर्याय जमिनीचा आहे. त्यानुसार सरकारी मालकीची जमीन एनएचएलएमएलला ३० वर्षांच्या भाडेतत्त्वावर दिली जाईल. इतर विभागांच्या मालकीची जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित करून ती एनएचएलएमएलला भाड्याने दिली जाईल.खासगी जमीन असल्यास ती संपादित करून एनएचएलएमएलला दिली जाईल.

## चोरंबा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नवोदय परीक्षेत यशाची परंपरा कायम

धारूर । प्रतिनिधी

तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात अग्रस्थानी असणारी चोरंबा येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेची नवोदय परीक्षेत यशाची परंपरा कायम आहे. त्याबद्दल विद्यार्थ्यांचे व शाळेतील सर्व शिक्षकांचे शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे.

तालुक्यातील चोरंबा येथील जि.प.प्रा. शाळेने नवोदय प्रवेश परीक्षेत यशाची परंपरा कायम राखत या वर्षीसुद्धा शिवराज गणेश इरमले हा विद्यार्थी पात्र झाला आहे. यापूर्वी सुद्धा शाळेचे ७ विद्यार्थी पात्र झाले विशेष म्हणजे या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचे खाजगी क्लास नसतानासुद्धा हे विद्यार्थी शाळेतील शिकवणी च्या जोरावर नवोदय मधे निवडी पर्यंत जातात हे विशेष आहे व शाळेतील शिक्षक सुधा विद्यार्थ्यांना सर्व मार्गदर्शन व तयारी करून घेतात त्यांचे ही कौतुक करावे



तेवढे कमीच आहे. शिवराज इरमले आणि त्याला मार्गदर्शक करणारे शिक्षक खंदारे सर तसेच मुख्याध्यापक तोंडे सर, गायकवाड मॅडम, दीक्षित मॅडम, कलेढेले मॅडम, वाघमारे सर, फुटाणे सर, सूर्यवंशी सर,नाईकवाडे सर आणि पालक यांचे सहकार्य लाभले होते व शाळेच्या वतीने शिवराज चा सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत यावेळी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## डीबीटी करण्यासाठी आलेल्या वृध्देचा मृत्यू; धारुरमध्ये संजय गांधी योजनेचा बळी

### गावात जाऊन केवायसी करून घेण्याची व्यवस्था करावी, निराधारातून मागणी

धारुर । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यापासून बंद पडलेली पगार सुरु करण्यासाठी शहरातील तहसील कार्यालयात डीबीटी फॉर्म भरण्यासाठी आलेल्या सत्तर वर्षीय वृध्देचा तहसील कार्यालयात मृत्यू झाल्याची घटना आज दि.२७ मार्च गुरुवार रोजी घडली.

कमलबाई बाबुराव कसबे (वय वर्षे ७० रा. मोहा जहागीर) या तहसील कार्यालयात डीबीटी करण्यासाठी गेल्या होत्या. त्यांना तहसील कार्यालयातच उष्माघाताचा झटका आल्याची



प्राथमिक माहिती मिळाली. उपचारासाठी ग्रामीण रुग्णालयात नेत असतानाच मृत्यूने त्यांना गाठले. तहसील कार्यालयाच्या गलथान कारभारामुळे गेल्या अनेक महिन्यापासून संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ योजना, श्रावणबाळ योजना आदीचे अनुदान रखडले आहे. ठराविक लाभार्थ्यांचे अनुदान मिळत असल्याने लाभापासून वंचित असलेले शेकडो वृद्ध, निराधार, अपंग लोक पुन्हा पून्हा डीबीटी करण्यासाठी तहसील कार्यालयात येरझाऱ्या मारत आहेत. सतत अपमानित होणाऱ्या निराधार लाभार्थ्यांचे आता जीव सुध्दा जात असल्याचे आजच्या घटनेवरुन दिसून आले. या घटनेनंतर दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार याकडे लक्ष लागले आहे.

## माजी मंत्री बदामराव पंडित यांच्या रोजा इफ्तार पार्टीमध्ये उपस्थित रहा : यशराज पंडित

गेवराई । प्रतिनिधी



मुस्लिम समाजाचा पवित्र रमजान महिना सुरू असून, सालाबाद प्रमाणे याही वर्षी माजी मंत्री बदामराव पंडित व त्यांच्या परिवारांच्या वतीने रोजागार मुस्लिम बांधवांसाठी दि.२८ मार्च शुक्रवार रोजी नगरपरिषद छत्रपती शिवाजी महाराज सभागृह, छत्रपती शिवाजी महाराज चौक गेवराई येथे रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व मुस्लिम बांधवांनी उपस्थित राहावे असे, आवाहन युवा नेते यशराज भैय्या पंडित यांनी केले आहे. सर्व रोजादार मुस्लिम बांधवांसाठी विविध जाती धर्मातील नागरिक रोजा इफ्तारी पार्टी आयोजन करण्यासाठी परंपरा आहे. परंपरेनुसार माजी मंत्री बदामराव पंडित व त्यांच्या कुटुंबाच्या वतीने दरवर्षी रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन केले जात असून, याही वर्षी दि.२८ मार्च शुक्रवार रोजी माजी मंत्री बबनराव पंडित, माजी सभापती युध्दाजित पंडित, युवा नेते यशराज पंडित यांच्या वतीने रोजा इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व मुस्लिम बांधवांनी उपस्थित राहावे असे आव्हान युवा नेते यशराज पंडित यांनी केले आहे.

## आपल्या विजयामुळे आई वडिलांचा सत्कार होण, हा सर्वोच्च सन्मान : अनमोल गोतावळे

धारूर । प्रतिनिधी

आपल्या विजयामुळे आई-वडिलांचा सत्कार होण हा तर सर्वोच्च सन्मान असल्याचे नवोदय पात्र विद्यार्थी अनमोल गोतावळे यांनी सत्कार प्रसंगी गौरव उद्गार काढले. धारूर येथील अनमोल दत्ता गोतावळे यांचे नवोदय विद्यालयास निवड झाली त्याबद्दल त्याचा भव्य सत्कार ढगे कोचिंग क्लासेस च्या वतीने करण्यात आला. सर्व विद्यार्थ्यांनी त्याचे औक्षण्य करत त्याच्यावर पुष्पवृष्टी करत त्याचा सत्कार केला जानेवारी महिन्यामध्ये नवोदय प्रवेशासाठी परीक्षा झाली होती.

या परीक्षेमध्ये अनमोल गोतावळे यांनी ९७.५० गुण मिळवत ग्रामीण भागातून जिल्ह्यात अव्वल स्थान पटकावले आहे त्याचा सत्कार ढगे कोचिंग क्लासेसचे



संचालक नाथा ढगे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष रमेश रुद्रे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून चिंचपूर येथील उद्योजक अर्जुन लांब उपस्थित होते. यावेळी अनमोलचा त्याच्या आईवडिलांसमवेत सत्कार करण्यात आला प्रथम आई-वडिलांचा सत्कार केला व त्यानंतर अनमोलचा सत्कार करण्यात आला यावेळी तो म्हणाला माझ्या विजयामुळे आई-वडिलांचा सन्मान होतोय हे पाहून खूप आनंद वाटला हा सर्वोच्च सन्मान माझ्यासाठी आहे. आतापर्यंत ढगे कोचिंग क्लासेसचे ९८ विद्यार्थी नवोदय विद्यालय पात्र ठरले आहेत. याप्रसंगी क्लासेसचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे ज्ञानोत्सव प्रदर्शन संपन्न

तलवाडा । प्रतिनिधी

देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे २८ फेब्रुवारी हा राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्याचे औचित्य साधून दिनांक ७ मार्च २०२५ या दिवशी हा दिवस एक आगळ्यावेगळ्या पद्धतीने म्हणजेच ज्ञानोत्सव प्रदर्शन म्हणून आयोजित करण्यात आला.

प्रदर्शनाचे उद्घाटन, प्रमुख पाहुणे उत्तम साळवे (उपप्राचार्य सावरकर महाविद्यालय बीड), तुलसी शैक्षणिक समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे यांच्या हस्ते करण्यात आले तर, इंजि.दिपांकर रोडे, प्राचार्य उमा जगतकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

ज्ञानोत्सव प्रदर्शनामध्ये विद्यार्थ्यांनी फक्त विज्ञान विषयाचे प्रयोग न करता विविध विषयांवर शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली तयार केले. विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करणे आणि विविध वैज्ञानिक विषयांमधील त्यांची सर्जनशीलता आणि ज्ञान प्रदर्शित करणे हा या प्रदर्शनाचा उद्देश होता. हा केवळ एक शैक्षणिक कार्यक्रम नव्हता तर विज्ञानाच्या चमत्कारांचा शोध घेण्यासाठी तरुण मनांना एकत्र आणण्याचा उत्सव होता. सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत प्रदर्शन पाहण्यासाठी पालक, शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

## श्रीक्षेत्र मच्छिंद्रगडाचा फिरता नारळी सप्ताह नांदेवाली येथे २ एप्रिल रोजी पुष्पवृष्टीने प्रारंभ होणार

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील नांदेवाली येथे श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड निमगाव मायंबा येथील ४७ वा वार्षिक नारळी फिरता अखंड हरिनाम सप्ताह वैकुंठवासी धोंडीराम महाराज यांच्या प्रेरणेने ब्रह्मलीन संत निगमानंद महाराज यांच्या कृपा छत्राखाली महंत स्वामी जनार्धन महाराज यांच्या अध्यक्षतेखाली २ एप्रिल रोजी संत महंत ब्रह्मवंद भाविकांच्या उपस्थितीत पुष्पवृष्टीचा कार्यक्रमाने प्रारंभ होत असून ९ एप्रिल रोजी मच्छिंद्रगडाचे मठाधीपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सांगता होणार आहे. मौजे नांदेवाली येथे मच्छिंद्रगड चे




संस्थापक आध्यक्ष ब्रम्हलीन संत निगमानंद महाराज यांच्या जन्मभुमीत होत असलेला मच्छिंद्र गडाचा फिरता



नारळी सप्ताह मध्ये धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामध्ये पहाटे काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, गीता पाठ ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन, रामायण कथा, ज्ञानेश्वरी पारायण, प्रवचन, हरी किर्तन जागर इत्यादीचे आयोजन करण्यात आले आहे.

या सप्ताहात प्रवचनकार नवनाथ महाराज शास्त्री भालगाव, महंत सुरेशानंद महाराज शृंगारवाडी, महंत हनुमान महाराज शास्त्री मिडसांगवी, महंत भानुदास महाराज शास्त्री गोवळवाडा; महंत अतुल महाराज शास्त्री तागडगाव, महंत उद्धव महाराज शास्त्री नारायणवाडी, हनुमान चैतन्य शास्त्री आळंदी यांचे प्रवचन होणार आहे तर कीर्तनकार महंत ज्ञानेश्वर माऊली शिंदे आळंदी, विशाल महाराज खोले मुक्ताईनगर, केशव आप्पा नामदास, महंत प्रेममुर्ती शिवाजी महाराज नारायणगडकर, महंत कान्होबा महाराज देहूकर पंढरपूर, महंत महादेवानंद महाराज शास्त्री भारती पिंपळवंडी, महंत विठ्ठल महाराज शास्त्री गहीनाथगड, महंत देविदास महाराज शास्त्री नेवासा यांचे कीर्तन होणार आहे. रामेश्वर महाराज शास्त्री यांचे रामजन्म निमित्त किर्तन होणार आहे तर दैनंदिन रामायणाचार्य नंदकिशोर महाराज बोधेगाव यांचे तुळशी रामायण होणार आहे.

तर ९ ऐप्रिल रोजी महंत जनार्दन महाराज मच्छिंद्रगड यांचे अमृततुल्य काल्याचे किर्तन होणार आसुन त्या नंतर महाप्रसाद वाटप होईल सप्ताहात खातनाम गायनाचार्य मृदंगाचार्य यांचे संगीत भजन होणार आहे. सप्ताहात मच्छिंद्रगडाचे विणेकरी, मृदंगाचार्य, तबला वादक, हार्मोनियम, सह झंडेकरी, भाविक भक्त उपस्थित राहणार आहे. नांदेवाली गावाला प्रति पंढरपूर आवतार आसल्याचे नियोजन ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या सप्ताहाला भाविक भक्तगण मोठ्या प्रमाणावर सामील होणार आसल्याचे मच्छिंद्रगड चे मठाधीपती महंत जनार्दन महाराज यांनी बोलतांना व्यक्त केले तर ग्रामस्थांकडून सप्ताहात उपस्थित राहाण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# गेवराईत द मॅनेजमेंट गुरु निराधारांना सगळे मिळून चुरु!

## गणेशाने प्रसन्न केले पूर्णेचे काम खऱ्या लाभार्थ्यांना ठोकला रामराम?

गेवराई तालुक्याच्या निराधारांच्या हक्काचे अनुदान मिळावे म्हणून प्रशासन वेगवेगळ्या स्तरावर सतत कार्यरत आहे. निराधारांच्या हक्कासाठी अहोरात्र झटणाऱ्या प्रहार चे संस्थापक अध्यक्ष माजी मंत्री बच्चुभाऊ कडू यांचा सातत्याने सरकारकडे पाठपुरावा असतो. निराधार योजनेच्या माध्यमातून जे खरे लाभार्थी आहेत. ज्यांना अत्यंत या योजनेचा लाभ सहजपणे मिळावा, आणि अंध, अपंग, वयोवृद्ध, विधवा यांच्यासाठी या योजनेमार्फत अनुदान वाटप केले जाते. पण अंधेरी काळोख्यात निराधारांच्या हक्काचे खरे, लाभार्थी वंचितांच्या घशात घालण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसून येते.

**आडे-मुद्दा क्रॉस**

अहो, मायबाप तहसीलदार महोदय आपण न्यायदंडाधिकारी आहात. आपल्या दरबारात खऱ्या अर्थाने माणसाच्या हक्काचे प्रश्न या ठिकाणी मार्गी लागतात. म्हणून मोठ्या अपेक्षेने निराधार आपल्याकडे आतुरतेने पाहत आहे. त्यामुळे अनेकांना अडचणींना तोंड द्यावे लागते. आणि त्याचा नाहक त्रास होत आहे. याकडे लक्ष घालणे गरजेचे आहे. संजय गांधी विभाग तळघरात असल्याने बंद दाराच्या फटीतून दलालांची रांग गटपडीच्या सापटीतून सहज मार्ग मोकळा करत त्यांना वाट मोकळी केली जाते. याचे देखील माहिती तहसीलदार महोदयांना नसावी कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या या अनागोंदी कारभारामुळे तालुक्यातील अनेक ग्रामीण भागातील व शहरी भागातील प्रत्येक ज्येष्ठ नागरिक व लाभार्थी मोठ्या प्रमाणात त्रस्त आहेत. निवडणुकीच्या तोंडावर बोलायचं एक आणि करायचे एक असा फंडा तो राजकीय नेत्याचा धंदा असल्याने अनेकांच्या तोंडचा घास धन दांडगे लाभार्थी आपल्या वशिल्यांतर्गत मिळवतात. हे अत्यंत दुःखद बाब आहे. तेथील कंत्राटी कर्मचारी येणाऱ्या प्रत्येक लाभार्थ्यांच्या जीवावर उठला की काय? असा प्रश्न निर्माण होत आहे. त्यांची जाणीव देखील अनेक वेळा अनुभवायला मिळाली. पण काय करावं गेवराईच्या सामाजिक संघटना व पदाधिकारी हे झोपेचे सोंग घेतात एकाही राजकीय नेत्याला किंवा सामाजिक संघटनेला या लाभार्थ्याविषयी प्रश्न उठवायला वेळ नाही. हे खेदजनक आहे. नुसतं मी गल्लीचा पुढारी हिंडतो दारोदारी असे म्हणण्याची वेळ आली.




कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरोशावर एकाच आयडी क्रमांक वर हा खेळ खंडोबा चाललेला आहे. सत्य पुढे शहाणपण चालत नाही. असे म्हटले जाते, तसेच आता अध्यक्षासह समितीपुढे तहसील प्रशासन नसल्याने आता नवीन कॅम्प ग्रामीण भागात सुरू झाला आहे. त्या कॅम्पमुळे निराधारांचा प्रश्न निकाली लागणार नाही. तर थेट महसूल सेवकांच्या ताब्यात आयडी द्या, आणि प्रत्येक विभागातील महसूल सेवकांना आठ दिवसात पूर्ण महाडीबीटी करण्याचे आदेश द्या, जेणेकरून हजारो निराधारांच्या हक्काचे पेमेंट त्यांच्या खात्यात वर्ग होतील. गेल्या डिसेंबर ते चालू एप्रिल महिन्यापर्यंत हे पेमेंट बाकी आहे. पण यावर कुणीही आवाज उठवला नाही या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्याला वरिष्ठ अधिकाऱ्यांनी जॉब विचारला नाही. यामागे काय रहस्य आहे हे पाहणं अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. गणेशाने प्रसन्न केले पुरणेंचे काम ते ठोकतात निराधार यांना कायमचा राम राम? याप्रकरणी जिल्हाधिकारी महोदयांनी तात्काळ विशेष लक्ष घालून न्याय मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.



## अनुदानासाठी महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समितीचा लढा सुरूच!

कोल्हापूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या शिष्टमंडळाने काल राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांची इचलकरंजी येथील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयामध्ये भेट घेतली. यावेळी अनुदान पात्र असणाऱ्या शाळांना अनुदान व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ देण्याबाबत निवेदन सादर केले.

या मागणीवर प्रतिसाद देताना अर्थमंत्री ना. अजित पवार यांनी अनुदान पात्र व अंशतः अनुदानित शाळांना टप्पा वाढ देण्याचा प्रस्ताव सध्या विचाराधीन असल्याचे स्पष्ट केले आहे. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी कोणत्याही पद्धतीने काहीही शब्द नकारात्मक बोलले नाहीत. या अधिवेशनामध्ये अचानकपणे बजेट वाढल्याने हा मुद्दा निकाली लागला नसल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. यावेळी राज्य उपाध्यक्ष श्री खंडेराव जगदाळे सर यांच्यासह कोल्हापूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे संचालक श्री हेमंत धनवडे सर, हातकणंगले तालुकाध्यक्ष वि.ह. सपाटे सर, मुख्याध्यापक श्री अशोक शिंदे सर, श्री मुकुंद चव्हाण सर नरसिंह महाजन सर, श्रीमती अमृता शेट्टी मॅडम, सुप्रिया पवार मॅडम उपस्थित होत्या.

### विनाअनुदान शाळांना १००% अनुदान मिळेपर्यंत लढा सुरूच ठेवणार : जगदाळे

विना अनुदानित आणि अंशतः अनुदानित शाळेत काम करणाऱ्या शिक्षकांच्या हक्काच्या पगारासाठी आम्ही जो लढा सुरू केला आहे. हा लढा मागील काही दिवसापासून अधिक तीव्र होत आहे. अंशतः अनुदानित शाळांना पुढील टप्पा वाढ अनुदान मंजुर करून देणे. त्याच बरोबर त्यांच्या पदरात १००% अनुदान पडे पर्यंत महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीचा संघर्ष कायम सुरूच राहणार असल्याचे कृती समितीचे राज्य उपाध्यक्ष श्री खंडेराव जगदाळे यांनी सांगितले.

## सिरसदेवी परिसरात अवैधरित्या वाळूभरून कोणाच्या आशीर्वादाने दोन हायवा चालतात याचा शोध एस पी.साहेब लावा

सिरसदेवी । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरात आज दि.२३/०३/२०२५ रोजी सकाळी ७:३० च्या सुमारास तलवाडा रोड कडून सुसाट वेगाने दोन हायवा वाळूने भरलेल्या सिरसदेवी गावातून सिरसदेवी फाटा कडे गेल्या तसेच एक सिल्वर कलरची स्कॉर्पिओ लोकेशन देणारी पुढे होती.दिवसा ढवळ्या या वाळू माफियाचे धाडस कोनामुळे होते याचा तपास केला पाहिजे.तलवाडा परिसरातून वाळू भरून येणारे दोन हायवा सुसाट वेगात सिरसदेवी गावातून फाट्यावर जातात तरी कुठल्याच अधिकाऱ्यला किंवा पोलीस प्रशासनाला का दिसत नाहीत.? असा प्रश्न उपस्थित होत आहे. तसेच सिरसदेवी परिसरात वाळू माफियाकडून अनेक ठिकाणी वाळूचे साठे करण्यात आल्याचे नागरिकांत बोलले जात आहे.



पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत साहेब यांनी चार्ज घेतल्यापासून बीड जिल्ह्यात अनेक ठिकाणी कारवाया केल्या असून दोन नंबर वाल्यानवर छापेमारी करून गुन्हे दाखल केले आहेत यामुळे वाळू माफिया,गांज्या विक्री करणाऱ्यावर, दारू विक्री करणाऱ्यावर, गुटखा विक्री करणाऱ्यांना कॉवत याचा धाक घेत असल्याचे दिसत आहे.परंतु गेवराई तालुक्यातील सिरसदेवी परिसरातील वाळू माफिया,खुलेआम अवैध वाळू वाहतूक करत असल्याचे दिसत आहे.आज बीड पोलीस ॲक्शन मोडमध्ये असताना या वाळू माफियाना भीती का वाटत नाही याचा शोध घेतला पाहिजे बीड पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबादित रहावी यासाठी बीड पोलिसाकडून काळजी घेतली जात आहे.तसेच वाळू माफियासह गुंडाना बोलावून घेत परेड घेतली असताना सिरसदेवी परिसरात खुलेआम दोन हायवा अवैध वाळूवाहतूक कश्या करतात कोणाच्या आशीर्वादाने चालतात यांची चौकशी एस पी साहेबांनी केली पाहिजे तसेच या हायवा कोणाच्या आहेत याची चौकशी करून वाळू माफिया वर एमपीडीए अंतर्गत कारवाई करावी तसेच एस पी कॉवत साहेबांनी सिरसदेवी फाट्यावरील अनेक दुकानात सिसिटीव्ही लावलेले आहेत हे सिसीटीव्ही तपासल्यास किती हायवा वाळुने भरलेल्या तलवाडा रोड कडून येतात हे दिसून येईल तसेच स्कॉर्पिओ गाडी आणि हायवा कोणाचे आहेत याचा तपास लागेल.

## तलवाडा येथील दहा वर्षीय मुलाचा उजव्या कालव्यामध्ये बुडून मृत्यू

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील गणेशनगर भागात राहणाऱ्या शिवाजी लोखंडे यांचा मुलगा अमर लोखंडे (वय १०) हा बुधवारी दुपारी बारा वाजण्याच्या सुमारास काही मुलांसोबत पैठण उजव्या कालव्यात पोहण्यासाठी गेला होता. कुटुंबीय आणि पोलिस प्रशासनाकडून शोधकार्य सुरु केले असताना गुरुवारी दुपारी बारा किमी अंतरावरील जातेगाव शिवारात मृतदेह सापडला. अमर शिवाजी लोखंडे (वय १०, रा. तलवाडा, ता. गेवराई) असे



मृताचे नाव आहे.

गणेशनगर भागातील अमर लोखंडे बुधवारी (दि.२६) दुपारी पोहणाऱ्या काही मित्रांसोबत कालव्यावर गेला होता. दरम्यान, तो पाण्यात पडल्याने वाहून गेला. सोबतच्या मित्रांनी घराकडे धाव घेत त्याच्या कुटुंबीयांना माहिती दिली. कुटुंबीयासह ग्रामस्थांनी कालव्याकडे धाव घेतली. माहिती मिळाताच पोलिसही घटनास्थळी दाखल झाले. ज्या ठिकाणी अमर पडला तेथून काही अंतरापर्यंत शोध घेतला. परंतु, तो सापडला नाही. रात्र झाल्याने शोधकार्य थांबविले. परत गुरुवारी (दि. २७) सकाळी शोधकार्य सुरू केले असता अमरचा मृतदेह सापडला. तलवाडा ठाण्याचे सपोनि. सोमनाथ नरके, फौजदार स्वप्नील कोळींसह पोलिस कर्मचारी घटनास्थळावर दाखल झाले होते.

## परळी वैजनाथ नगरपरिषदेची थकीत कर वसुलीची धडक मोहीम सुरू

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या वतीने शहरामध्ये घरपट्टी, जमीन कर, इमारत किराया मोबाईल टॉवर भाडे, पाणीपट्टी व दुकान शॉपिंग सेंटरची वसुली करण्यासाठी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. ही धडक वसुली मोहीम नगर परिषदेच्या मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करवसुलीसाठी ६ पथके तयार केली आहेत. या पथकाच्या नेतृत्वाखाली तीव्र करण्यात आली असून, शहरातील इमारत भाडे थकवणाऱ्यांची गाळे सील करून कारवाई करण्यात आली आहे. परळी शहरातील नागरिकांनी वसुली मोहिमेस सहकार्य करून नागरिकांनी त्यांच्याकडील थकीत असलेली विविध करांचा भरणा करून संभाव्य कारवाई टाळावी असे आव्हान मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, आर्थिक वर्षातील शेवटचा मार्च महिना संपत आला तरी परळी वैजनाथ शहरातील काही मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर आणि पाणीपट्टी भरली नसल्यामुळे नगरपरिषद क्शन मोडवर आली आहे. नगरपालिकेने करवसुलीसाठी ६ पथके तयार केली आहेत. त्याद्वारे घरोघरी जाऊन संबंधित मालमत्ताधरकांकडून करवसुली केली जात आहे. तसेच शहरातील मुख्य १० ठिकाणी थकबाकीदारांची नावे असलेले बॅनर लावले जाणार आहेत. करभरणा करण्यासाठी दररोज घंटागाडीतून अनाउन्समेंट दिली जात आहे. शहरात वसुली मोहीम तीव्र करण्यात आली असून पुढील काही दिवसात थकबाकीदारांच्या मालमत्ता सील करण्यात येणार आहे.

सुट्टीच्या दिवशी सुध्दा वसुली लिपिकांकडे नागरिक कर भरू शकतात. तरी अनेक मालमत्ताधारक याकडे कानाडोळा करतात. त्यामुळे कर बुडवणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी पथकांद्वारे थकबाकीदार असलेल्या मालमत्ता सील केल्या जात आहेत. परळी शहरातील थकबाकीदारांनी आपला करभरणा करून नगरपरिषदेला सहकार्य करावे अन्यथा दंडात्मक कारवाई केली जाईल. परळी शहरातील नागरिकांना सोयी सुविधा देण्यासाठी नगरपालिकेचे उत्पन्न वाढवावे लागणार आहे. नागरिकांच्या सहकार्यानेच हे काम पूर्ण होणार आहे. तरीशहरातील नागरिकांनी विविध करांचा भरणा करून संभाव्य कारवाई टाळावी मुख्याधिकारी तथा प्रशासक त्र्यंबक कांबळे यांनी केले आहे.

## टाकरवण येथे जल जीवन मिशनच्या बोगस कामामुळे नागरिकांची भटकंती

टाकरवण । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथील जल जीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या बोगस कामाची तात्काळ चौकशी करून कारवाई करावी अशी मागणी मानवी हक्क अभियान संघटनेचे माजलगाव तालुका सचिव कपिल आडागळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

जलजीवन मिशनचे काम कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे रखडल्याने टाकरवन गावाला पाणी टंचाई झळा सोसाव्या लागत आहेत. पाणीपुरवठा योजनेअभावी पाणी पुरवठ्याची मदारही गावातील मोडक्या-तोडक्या हातपंप, मोजक्याच बोअरवर आहे. यामुळे सांडपाणी व पिण्यासाठी पाणी आणण्यासाठी ग्रामस्थांना तास ते दोन तास रांगेत उभे रहावे लागत आहे.



दरम्यान सुर्य आग ओकत असल्याने तापमानाचा पारा वाढत आहे. यामुळे जमिन व जलस्त्रोतांचे बाष्पीभवन होत असल्याने पाणी पातळीत झपाट्याने घट होत आहे. अशा स्थितीत येत्या काळात हातपंप, बोअरही कोरडे पडण्याची शक्यता असून पाण्यासाठी टाकरवनवासीयांना भटकंती करण्याची वेळ येणार असल्याची स्थिती जलजीवन मिशन योजनेचे काम करत असलेल्या कंत्राटदारामुळे निर्माण झाली असल्याची संतप्त भावना ग्रामस्थांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

घरो-घर नळ आणि घरो घरी पाणी पोहचविण्यासाठी शासनस्तरावरून टाकरवन गावासह अंतर्गत वाडीवस्ती, तांडा येथील उंबऱ्यांसाठी जल जीवन मिशन योजनेअंतर्गत ४ कोटी ६०लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आलेला आहे. टाकरवण येथील जलजीवन कामात होत असलेल्या कामावरून दिसून येत आहे. वर्क ऑर्डर कार्यारंभ आदेश मध्ये १८ महिन्याच्या आतमध्ये काम करायचे सांगितले होते. नसता दहा ते टक्के दंड आकारण्यात येईल असे सांगितले होते. जवळपास जलजीवन मिशनच्या कामाला तीन वर्षे झाले आहेत तरी त्यांच्या वरती दहा टक्के दंड आकारण्यात यावा. अशी तक्रार कपिल आडगळे नी यांनी जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषद मुख्य ना कार्यकारी अधिकारी यांना दिलेली आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT